## फौजदारी खटला क्र.४/२०१६ मधील निशाणी क्र. २५ वरील आदेश

अर्जदार अनिल कोष्टी प्रस्तुतचा अर्ज कलम ३०१ आणि ३०२ फौजदारी प्रक्रिये संहीते अंतर्गत दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी असे कथन केलेले आहे की, अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणातील वृक्ष तोड घडलेली घटना मिळकत ही विकसनासाठी दिलेली होती. त्याबाबतचा विकसन करारनामा अर्जदार आणि आरोपी यांच्यामध्ये झालेला आहे. त्याप्रमाणे दोघांच्या समतीने मंजुर नकाशा न. सी.सी. ३०५३ हा मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा नकाशा मंजुर करतांना वृक्ष प्राधीकरण उद्यान विभाग पुणे महानगरपालीका यांचा नाहरकत दाखला देणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे प्रस्तावित नकाश्या मध्ये अस्तित्वात असलेल्या वृक्षांची संख्या दाखवण्यात आलेली आहे. त्यानुसार पहिल्या मंजुर नकशा प्रकाणे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला आहे. सदर दाखला देण्यापुर्वी वृक्ष प्राधिकरण उद्यान विभाग यांनी ९ वृक्षाचे संवर्धन केले आहे. या अटी व शर्तीवर जागेवर पाहणी करुन आरोपी यास बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी शिफारस पत्र आणि नाहरकत प्रमाणपत्र दि.०५-०२-२००४ रोजी देण्यात अलेले आहे. परंतु कायदेशीर पुर्तता पुर्ण होताच आरोपी यांनी अर्जदार यांच्या परवानगी शिवाय नविन बांधकाम नकाशा दाखल केला. त्यामध्ये वृक्ष काढुन पार्कींग दाखवण्यात आल्या त्याप्रमाणे दि.१३-०५-२००४ रोजी नकाशा मंजुर करुन घेण्यात आला. सदर

नकाशा प्रमाणे वृक्ष यांच्या जागी पार्कींग करण्याकरीता वृक्ष काढून पाडून टाकण्याची परवानगी न घेता वृक्ष प्राधिकरण उद्यान विभागाची फसवनूक करुन बांधकाम नकाशा मंजुर करुन घेण्यात आला आणि त्याठिकाण अनाधिकृत पार्कींग उभारण्यात आले आरोपी आणि इतर लोकांनी विनापरवाना ९ वृक्षाची तोड केलेली आहे. सदर जागेमध्ये ९ वृक्ष होते या बाबत सक्षम पुरावा आहे. त्यामुळे सदर खटल्याचा योग्य न्यायनिर्णय लागणे कामी अर्जदार यांना पुरावा दाखल करण्यासाठी सरकारी वकील यांच्या समतीने लेखी युक्तीवाद दाखल करण्याकामी प्रस्तुत खटल्यात सामील करुन घेणे न्यायाचे व गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती प्रस्तुत अर्जान्वये करण्यात आलेली आहे.

०३. फिर्यादी यांच्या विधीज्ञानी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवली. सदरचा अर्ज हा योग्य नाही कारण फिर्यादी हा अनिल साबळे आहे. पालीके तर्फे त्यांनी कलम ८ अन्वये प्रस्तुतची केस दाखल केलेली आहे. त्यामुळे अजर्दार यांचे प्रस्तुत प्रकरणात हजर होण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०४. आरोपी यांनी निशाणी २१ वर म्हणणे सादर करुन सदर अर्जास हरकत नोंदवली. त्यांनी असे कथन केले की, प्रस्तुत अर्जदार यांनी आरोपी विरोधात दिवाणी न्यायालय येथे साधारणतः ९ केसेस दाखल केलेले आहे. सदर अर्जदार यांचा प्रस्तुत प्रकरणाशी कोणताही संबंध नसुन केवळ आरोपीस त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल अर्ज

केलेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे नाव अनिल गंगाराम कोष्टी असे नमुद केलेले असून त्यांनी अनिल आर. कोष्टी अशी स्वाक्षरी केलेली आहे. त्यामध्ये सदरचे व्यक्ती ही दोन वेगवेळ्या व्यक्ती असू शकतात ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच, अनिल आर कोष्टी हे प्रस्तुत प्रकरणात पंच साक्षीदार असून त्यांना साक्षी पुराव्याच्या वेळी पुरावा सादर करण्याची संधी मिळणार आहे. सदर अर्जदार यांचा प्रस्तुत प्रकरणची कोणताही संबंध नसल्याकारणाणे त्यांना सदर प्रकरणात सामील करण्याची आवश्यक्ता नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता आरोपी विरोधात कलम ८(१) सह कलम २१ (१) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनीयम १९७५ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे. फिर्याद वरुन आरोपी यांचे विरोधात इसु प्रोसेसचा आदेश झाल्यानंतर आरोपी प्रस्तुत प्रकरणात हजर झालेला आहे. दि.०२-०२-२०१९ रोजी आरोपी याची प्ली रेकॉर्ड करण्यात आलेली आहे. तेव्हापासून प्रस्तुतचे प्रकरण हे पुराव्याकामी प्रलंबीत असल्याचे दिसून येते. अर्जदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे आरोपी आणि अर्जदार यांच्या मध्ये विकसन करार झालेला आहे. त्याप्रमाणे मंजुर नकाशा आणि बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला आहे. असे असतांना देखील अर्जदार यांनी पुन्हा ऐकदा नविन नकाश मंजुर करुन घेतलेला आहे आणि ९ वृक्षाची तोड करुन त्या ठिकाणी पार्कींग उभारलेले आहे.

त्याबाबचा पुरावा सदर अर्जदार यांच्याकडे आहे. अर्जदार आणि आरोपी यांच्यामध्ये जो काही करार झालेला आहे त्याचा प्रस्तुत प्रकरणाशी कोणताही संबध नाही. फिर्यादी हे सक्षम अधिकारी असून त्यांना योग्य त्यांनी तरतुदी मध्ये प्रस्तुतचे प्रकरण दाखल करुन आरोपी विरोधात कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे.

७. फिर्यादी यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करुनच प्रस्तुतची कार्यवाही दाखल केली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी हे सक्षम साक्षीदार आहेत. अर्जदार यांच्याकडे जे काही पुरावे आहेत ते फिर्यादी यांचे मार्फत सादर होउ शकतात. वर नमुद केल्याप्रमाणे आरोपी आणि अर्जदार यांच्यामध्ये जे काही करार किंवा व्यवहार झालेला आहे त्याचा प्रस्तुत प्रकरणाशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जदार यांनी या प्रकरणात सामील करुन घेण्याचे कोणेतेही कारण नाही. प्रकरण हे पुराव्या करीता प्रलंबीत असतांना अशा प्रकारच्या अर्जामुळे प्रकरणात विनाकारण विलंब होत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा नामंजुर करण्यास पात्र आहे. करीता खालील प्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजुर करण्यात येते.

सही/-

**(एस. एच. तेलगांवकर)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
(मनपा न्यायालय), पुणे.

ठिकाणः पुणे.
दिनांकः ०६/०७/२०२२.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D. F. file of order are same, word to word, as per the original order.

Name of Steno : A.K.Mohammad. (L.G. - III)
Court Name : Smt. S. H. Telgaonkar,
C.J.J.D. & J.M.F.C., PMC Court, Pune.
Date of Order : 06.07.2022.
Date of signature : 06.07.2022.
Date of upload : 07.07.2022.